Research Papers

# गौरी देशपांडे आणि काही समकालीन कथालेखिका

डॉ. अरुण देवरे ,
बिर्ला महाविद्यालय , कल्याण

## Abstract

समकालीन कथालेखिकांच्या कथालेखनाची वैशिष्ट्ये आणि सानिया, आशा बगे, प्रिया तेंडुलकर या निवडक कथाकारांचे गौरी देशपांडे यांच्याशी असणारे लेखनातील साम्यभेद यांच्याबद्दल चर्चा केलेली आहे

.गौरी देशपांडे यांचे कथालेखन 1970 पासून सुरु होते. या कालखंडात त्यांच्या बरोबरीने लेखन करणाऱ्या सानिया, आशा बगे, प्रिया तेंडुलकर यांना गौरी देशपांडे यांच्या समकालीन म्हणता येईल.

स्त्रियांच्या लेखनाबाबत डॉ. भालचंद्र फडके आपली भूमिका स्पष्ट करताना लिहितात, 'स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जाणवतो तो लेखिकांचा कथाकादंबरी क्षेत्रातला उदंड उत्साह. गवता ऐसे उदंड वाढत चाललेले लेखिकांचे लेखन मराठी साहित्याच्या विकासाला सहाय्यभूत होऊ शकत नाही याची खंत वाटते. या लेखिकांपेक्षा वृत्तिगांभीर्याने लिहिणाऱ्या, कलात्मकतेची समज असणाऱ्या, मूल्यविषयक जाणीव असलेल्या दुर्गा भागवत, इरावती कर्वे, कमल देसाई, मालती देसाई, इंदिरा संत, विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे, सानिया, अंबिका सरकार इत्यादी लेखिका आहेत. त्यांची संख्या कमी आहे. त्यांच्या लेखनाची जातकुळी वेगळी आहे....''23

आशा बगे यांच्या कथेतील स्त्रियांचे जग वेगळे आहे. मध्यमवर्गीय ब्राह्मणी संस्कृतीजवळ जाणारे हे जग आहे. म्हणून त्यांच्या व्यक्तिरेखांवर सत्प्रवृत्तीचा सुसंस्कृतपणाचा प्रभाव आढळतो. त्यांच्या कथेतील स्त्रिया स्वैरतेपासून आणि मोहापासून चार हात दूर राहतात. त्यामुळे शारीरिक संबंधाचे चित्र त्यांच्या कथातून रेखाटले जात नाही. त्यांच्या कथातून स्त्रीपुरूषांची मानसिक अवस्था चितारली जाते. उदाहरणार्थ मारवा या कथासंग्रहातील रंग ही कथा.. .. परंपरागत चालत आलेल्या अनुभवांना संगीताची जोड देऊन रचलेली ही कथा आहे. संगीतातील सूर घेऊन येणारी ही कथा देवेंद्रचा अपघातात पाय गमावल्यामुळे या कथेतील नायिकेत मानसी व नायक देवेन्द्र यांच्यात एकरूपत्व आणि दूरत्व आलेले दिसते. 'रंग' या कथेतील मोठा ख्याल संपवून बुवांनी द्रुत चीज घेतली....'24 असा संदर्भ या कथेतून येताना दिसतो.

त्याचबरोबर नातं ही कथा दर्शनच्या बायकोच्या जळण्याच्या प्रसंगातून चित्रित होताना दिसून येते. ही वेगळ्या घाटणीची कथा आहे. मानवी नाती अनाकलनीय असतात कारण या मानवी नात्यांमागील मनही अनाकलनीय असते. दोन व्यक्तीमधील नात्यातील संबंध तिसऱ्यालाही समजत नसतात. एका मृत्यूच्या निमित्ताने जाणवलेल्या नात्यांची अशी विक्षिप्त गुंतवळ आशा बगे यांच्या कथेतून बघायला मिळते.

त्यांच्या कथेतील नायिका विचारशील आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेल्या आहेत. ती कथा माणसांमधील भावसंबंधाचा शोध घेते. जुन्या परंपरेवर नाते सांगते. मांगल्यावर ती आधारलेली आहे.

प्राचीन काळातील कर्मकांड, व्रते, वैकल्ये, सणसमारंभ, उत्सव, कीर्तन आदी गोष्टींना आशा बगे यांच्या कथेत विशेष स्थान प्राप्त होते. ब्राह्मण कुटुंबातील नातीगोती, रीतिभाती यांचे चित्र त्यांच्या कथेतून अधोरेखित होते. या कुटुंबांना कीर्तन, नाटक आणि संगीत यांचा वारसा लाभलेला असतो. बगेंच्या कथातून प्रयोगशीलता, रूपके, फँटसी आदी गोष्टी अभावानेच येतात. स्वप्ने, फँटसी, संज्ञाप्रवाह आदींचा उपयोग त्यांच्या कथेत केला जात नाही. कारण त्यांच्या कथा जाणीवेच्या स्तरापर्यंतच मर्यादित राहतात. दुर्बोधता, गूढता या पातळ्याही त्यांची कथा गाठत नाही.

माणसामाणसातले बंध शोधू पाहणाऱ्या सानिया यांना मानव आणि मानवी संबंध यातल्या नात्यामध्ये विशेष रूची आहे. मानवी संबंध शाश्वत आहेत आणि या शाश्वतावर यांचा गाढ विश्वास आहे.

Review Of Research
Vol.1,Issue.III/*Dec;* 2011

माणसांचा शोध हाच त्यांचा लेखनाचा केंद्रबिंदू आहे. 'शोध' सारख्या कथासंग्रहामधून लेखिका मानवी नात्यातील एकाकीपणाचा आणि वैफल्याचा शोध घेताना दिसून येतात. शोध कथेतील 'मनू, निर्मल' रिच्युअलमधील 'सुमित्रा, शिरीष', फ्रेम मधील 'कल्याणी, श्रीनिवास' या व्यक्तिरेखांमधील माणसांचा शोध घेतलेला दिसून येतो.

रिच्युअल या व अशासारख्या कथातून एकाकीपणाने ग्रासलेली सुमित्रा चित्रित होताना दिसते. तरूणपणात तिचे शिरीष नावाच्या नायकावर ती प्रेम करीत असते. त्याचेदेखील तिच्यावर प्रेम असल्याचे दिसून येते. पुढे काय होते ते कळत नसल्याचा संदर्भ येतो. त्यानंतर सुमित्रा आईवडिलांच्या विरोधात जाऊन वसुदेवशी विवाहबद्ध होते. त्याच्यापासून तिला मुलगी होते. तेव्हा ती खूप त्रागा करताना दिसते. वसुदेव तिला समजावणीच्या सुरात समजावतो देखील.... परंतु ती सर्वांशी अलिप्तपणाने वागताना दिसून येते. एक दिवस मुलीसहीत विभक्त होताना दिसते. ती मुलीशी असलेली नाळ तोडून टाकते. म्हणजे मुलीला वसतिगृहात सोडून येताना दिसते आणि आपण एकट्याा आहोत अशा भावनेने खेद करीत राहताना दिसते.

त्याचबरोबर खिडक्या या कथासंग्रहातील प्रारंभी खेळाच्या या कथेत स्वतःच्या मनाप्रमाणे विवाहबद्ध होणारी नंदिता नवऱ्याच्या अपघाती निधनाने विधवा होते. प्रेमकथेसारख्या असणाऱ्या या कथेतून पुनर्विवाह आणि आत्महत्या हे मार्ग न स्वीकारता प्रश्नार्थक अवस्थेत ही कथा संपून जाताना दिसते.

सानियांच्या नायिका विचार करणाऱ्या आहेत. प्रश्न विचारणाऱ्या आहेत. काहीतरी करावं असं वाटण्याच्या उर्मीला त्या सामोऱ्या जातात. त्या स्थितिशरण नाहीत. सहजपणे काहीही सहन करणाऱ्या नाहीत. प्रश्न विचारीत त्या आयुष्याला भिडतात.

कोणत्याही तऱ्हेचे परावलंबन सानियाच्या कथातील नायिकांना नापसंत आहे. शोध मधील प्रमुख व्यक्तिरेखा एकाकीपणाने ग्रासली आहेत. एकाकीपणाचा अनुभव व्यक्त करण्याचा प्रयत्न या कथातून येतो. प्रिया तेंडुलकर यांच्या कथेतील समस्याही केवळ व्यक्तिगत पातळीवर राहत नाहीत. उलट येथील स्त्रीचा एकाकीपणा अधिक ठळक बनतो. माणसाचे एकटेपण गौरी देशपांडे ही आपल्या लिखाणातून टिपताना दिसतात.

गूढता, धूसरता हे सानियांचे खास वैशिष्ट्या आहे. यामुळे त्यांचे अनुभव प्रत्ययकारी होत नाहीत. धूसरतेचा परिणामही त्यांच्यावर होतो. या कथांच्या केंद्रवर्ती भूमिकेत स्त्रिया आहेत. त्यांच्या वागण्याबोलण्यातून त्या आकार घेतात. त्यांच्या वृत्ती, त्यांचा दृष्टिकोण हा या कथांचा कणा आहे.

प्रिया तेंडुलकर यांची प्रत्येक कथा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या स्त्रीत्वाशी व स्त्रीमनाशी संबद्ध असलेली आहे. त्यांच्या कथा स्त्रीपुरूषांच्या संबंधाचे, त्यांच्या सहजीवनाचे, सहजीवनातून निर्माण होणाऱ्या अटळ प्रश्नांचे स्वरूप चित्रित करणाऱ्या असतात. ज्याचा त्याचा प्रश्न या व अशासारख्या कथासंग्रहातील काही मासले अभ्यासता येतील. नकटीच्या लग्नाला, लग्न संपल्यानंतर, सॉरी फॉर द लास्ट नाइट अशा सारख्या कथातून वैवाहिक संबंधातून निर्माण होणाऱ्या स्त्रीच्या मानसिक उद्ध्वस्तता चित्रित होताना दिसते. नकटीच्या लग्नाला यासारख्या कथेतून निरंजन भारतीय नवरा नायिकेच्या स्वातंत्र्यावर गदा आणताना दिसतो. रॉबर्ट, पाश्चिमात्य नवरा स्वतःच्या सुविधेसाठी शारीरिक संबंध ठेवताना दिसतो. ह्याा दोन्ही सुस्थितीचे आकलन त्या स्त्रीच्या शक्तीपलिकडचे असते. यामुळे ती मनाने कोलमडून पडते.

लग्न सारख्या कथेतून अनिता केळकर या स्त्रीला विवाहानंतर अध्यात्मप्रवण कुटुंबात स्वतःला सामील करण्याचा प्रयत्न करताना दिसते. त्याचबरोबर चेहरे नसलेल्या शरीर मिलनातील भयाण स्वरूपाला तिला सामोरे जावे लागते. लग्न संपल्यावर सारख्या कथेतून विवाहसंबंध संपुष्टात आल्यावर सभोवतालच्या दृष्टीने आपल्या आयुष्याला प्राप्त होणारे निरर्थक व अपेक्षित स्वरूप तिच्या जीवनात एक प्रश्नचिन्ह आणून पोकळी निर्माण करताना दिसते.

त्याचबरोबर सॉरी फॉर द लास्ट नाइट या सारख्या कथेतून वैवाहिक जीवनात निर्माण होणाऱ्या समस्यांना दुराव्याला आणि तडजोडीला एक अनोखा अर्थ लेखिका देताना दिसून येतात. या कथेतील शेखर हा नायक शारीरिक आणि मानसिक छळ करणारा आहे असे दिसते. दिवसाचे एक आणि रात्रीचे एक अशी भिन्न रूपे घेऊन वावरणारा शेखर हा विलक्षण लहरी असा आहे असे दिसते. याचे कोणते रूप खरे मानावयाचे, प्रियकराच्या भूमिकेतील प्रतिष्ठित आणि सभ्य उद्योगपतीचे की रात्रीचे पशूसदृश्य?या प्रश्नांनी गोंधळलेली स्त्री या कथेतून आपल्यापुढे उभी राहताना दिसते.

लग्नसंस्थेशी निगडित प्रश्न सानिया, आशा बगे, प्रिया तेंडुलकर यांच्या कथातून मांडले जातात. सानिया यांची 'रिच्युअल,' गौरी देशपांडे यांची 'कावळ्याा चिमण्याची गोष्ट' आणि प्रिया तेंडुलकर यांची 'सॉरी फॉर द लास्ट नाइट' या कथातही खूपसे साम्य आहे असे दिसते. 'रिच्युअल' सारख्या कथेत लग्नसंस्थेमुळे अटळपणे वाट्याला आलेल्या सक्तीच्या मातृत्वाचे अनुभव मांडले आहेत. 'कावळा चिमण्यांची गोष्ट' या कथेत लग्नसंस्थेसंबंधीची बंडखोर भूमिका लेखिकेने घेतलेली आहे. 'सॉरी फॉर द लास्ट नाइट' या कथेतील नायिका लग्नसंस्थेसंबंधी प्रश्न उपस्थित करते.

आशा बगे यांच्या कथेतील स्त्रिया अल्पस्वल्प बंडखोर असतात. परंतु त्यांच्यावर सुसंस्कृतपणाची छाप असते. म्हणून त्यांच्या नायिका संघर्ष नाकारतात. सानियांच्या कथानायिका गौरी देशपांडेंच्या नायिकांइतक्या बंडखोर नाहीत. त्या खूप वेळा आत्मपरीक्षण करतात आणि संयम राखून कुटुंबव्यवस्था जपताना दिसतात. गौरी देशपांडे यांच्या नायिका बंडखोरी करतात आणि पुरूषप्रधान व्यवस्थेला छेद देतात.

स्त्रीपुरूषसंबंधविषयक शोध बगेंच्या लिखाणात कुठेही येत नाही. गौरी देशपांडे यांच्या लिखाणात स्त्रीच्या शारीरिक संबंधाचे चित्रण धाडसाने येते. प्रिया तेंडुलकर यांनीही स्त्रीपुरूष संबंधाचे बोलके चित्रण केलेले आहे. सानियाच्या कथातूनही स्त्रीचे शरीरनिष्ठ अनुभव येतात. पण बगेंच्या कथेने जीवनातील मानवामानवातल्या नात्याचे नितळ दर्शन घडवलेले दिसते. म्हणूनच गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडुलकर या सर्व समकालीन लेखिकांच्या कथेहून बगेंची कथा वेगळ्याा वळणाची कथा आहे. ती जीवनाच्या गाभ्याला स्पर्श करते.

गौरी देशपांडे आणि सानिया यांच्या कथांमध्ये उच्चवर्गाचे चित्रण येते. दोघींच्या नायिका शिक्षित, कमावणाऱ्या आणि स्वतंत्र वृत्तीच्या आहेत. पारंपारिक नीतिकल्पनांना झुगारून देणाऱ्या आहेत. स्त्रीपुरूष संबंधांना लग्नचौकटीत बसविणे त्यांना नापसंत आहे. स्वमुक्तीचा ध्यास त्यांना आहे. परंतु पुरूषांशिवाय त्यांचे चालत नाही. दोघींच्या कथेत अपरिपूर्णतेचे दुःख आहे. सानियांच्या कथेत वेणावेदना जास्त आहेत. प्रयोगशीलता त्यांच्या कथेतून येताना दिसते. माणसाच्या अंतर्विश्वाचा शोध सानिया घेतात. म्हणून त्यांची कथा गौरी देशपांडेपेक्षा वेगळी ठरते.

स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या एकाकीपणाचा प्रत्यय गौरी देशपांडे 'कावळा चिमण्यांची गोष्ट', सानिया 'प्रतीती', आशा बगे 'नातं', प्रिया तेंडुलकर 'इडियट बॉक्स' या व अशासारख्या कथातून येताना दिसतो. त्याचबरोबर सानियांच्या प्रतीतीमधील आशा बगे यांच्या 'रूक्मिणी' प्रिया तेंडुलकर यांच्या 'ज्याचा त्याचा प्रश्न' मधील स्त्रीव्यक्तिरेखामधून स्त्रीमनाचे विविध स्तर येताना दिसतात.

गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, प्रिया तेंडुलकर या सर्व लेखिकांच्या लेखनाचा घटक स्त्री आहे. हा समान धागा त्यांच्या कथातून दिसून येतो. स्त्री ही त्यांच्या चिंतनाचा विषय आहे. विश्वाच्या अथांग महासागरात स्वतःचे अस्तित्व शोधणाऱ्या नायिका या लेखिकांनी साकार केल्या आहेत. आधुनिक स्त्री सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्याा कितीही स्वावलंबी झाली तरी तिची ससेहोलपट थांबलेली नाही. त्याचे चित्रण या लेखिका आपल्या लेखनातून करताना दिसतात. त्याचबरोबर या लेखिकांच्या कथांमधील वातावरण मध्यमवर्गीय, सुखवस्तू या तऱ्हेचे आहे. परंतु या स्त्रिया

धडपडणाऱ्या स्वभान जपणाऱ्या आणि सृजनशील मनाने आयुष्याला सामोऱ्या जाताना दिसून येतात.

डॉ. अरूणा दुभाषी लिहितात, ''गौरी देशपांडे'' यांची कथा अत्यंत तटस्थपणे अनुभव साकार करते. सहजपणे सहानुभूतीचा विषय होऊ शकतील असे अनुभवही त्यांच्या कथेत भावुकतेचा स्पर्श टाळून काहीशा उपरोधिक, औपचारिक, सुरात व्यक्त केलेले दिसतात. त्यामधूनच त्या अनुभवांना सामर्थ्य प्राप्त होते. सानिया यांची कथा कधी खूप साधी, सरळ, तपशिलांतून – घटनांतून विकसित विस्तारित मनाच्या तळाचा वेध घेत जाताना दिसते. कधी निवेदनाचे वेगवेगळे प्रयोग दिसतात. आशा बगे यांची कथा साध्यासुध्या पारंपारिक वाटणाऱ्या कुटुंबचित्रांतून आणि कीर्तन, आख्याने, यांच्या व कृष्णरूक्मिणी यांसारख्या प्राचीन संदर्भातून मानवी जीवनाविषयक गंभीर आणि सखोल अनुभव प्रकट करताना दिसते....'25 याचाच अर्थ असा की, गौरी देशपांडे यांची कथा नावीन्यपूर्ण निवेदनाचे प्रयोग करताना दिसते. त्याचबरोबर आशा बगे यांच्या कथेमध्ये पारंपारिकता आणि नवता यांचे संमिश्र रसायन दिसून येते.

गौरी देशपांडे आणि सानिया यांनी उच्चमध्यमवर्गीय स्त्रीजीवन रेखाटलेले दिसून येते. त्यांच्या अनुभव विश्वाला मर्यादा आहेत. स्त्रीस्वातंत्र्याचा विचार त्यांच्या लिखाणातून येताना दिसतो. स्वअस्तित्व जोपासणाऱ्या स्त्रियांचे विश्व या लेखिका चित्रित करताना दिसतात. हे त्यांच्या लेखनातील साम्य आहे असे दिसून येते. त्याचबरोबर या दोन्ही लेखिकांनी देशविदेशामधून भटकंती केल्यामुळे त्यांचा जीवनाविषयक दृष्टिकोण विस्तारशील आहे. आधुनिक स्त्रियांचे भावबंध या लेखिका चित्रित करताना दिसतात. स्त्रीपुरूष नात्यातील मनमोकळेपणा या लेखिकांच्या लेखनातून चित्रित होताना दिसतो. हा या लेखिकांमध्ये समान धागा दिसून येतो. मूल दत्तक घेणे हा विषय घेतला तर गौरी देशपांडे यांची कलिंगड आणि सानिया यांची 'वलय' या कथासंग्रहातील 'खेळ' या कथेत खूपच साम्य आहे असे दिसून येते. 'कलिंगड' या कथेत मूल होत नसलेल्या दाम्पत्याने अनाथालयातून मूल सांभाळायला आणण्याचा अनुभव 'कलिंगड' सारख्या कथेत गौरी देशपांडे यांनी मांडला आहे असे दिसून येते. त्याचबरोबर सानिया यांच्या 'वलय' कथासंग्रहातील 'खेळ' या कथेतील रोहिणीला मातृत्वाची ओढ असते म्हणून ती अनाथालयातून मीनल या मुलीला दत्तक घेताना दिसून येते.

सानिया आणि प्रिया तेंडुलकर या आपल्या लिखाणातून जीवनविषयक मौलिक प्रश्न चित्रित करताना दिसतात. त्यांच्या नायिका स्वभान जोपासताना दिसतात. त्याचबरोबर आशा बगे आणि सानिया यांनी साकारलेल्या नायिका परिस्थितीशरण असतात. पारंपारिकतेला देखील त्यांच्या कथातून वाव दिलेला दिसून येतो. पुढ्यात वाढून ठेवलेल्या जीवनाला मोठ्या सामर्थ्याने झुंज देणाऱ्या नायिका या लेखिका साकारताना दिसतात. हा समान धागा या लेखिकांच्या लेखनातून चित्रित होताना दिसून येतो. त्याचबरोबर आधुनिक स्त्रीचे दुःख मांडणारी प्रिया तेंडुलकर यांची कथा गौरी देशपांडे आणि सानिया यांच्या परंपरेतील आहे.

गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडुलकर यांच्या लेखनात कधी कधी विदेशी वातावरण येताना दिसते. 'आहे हे असं आहे' मधील मार्सडन, 'देणं' या कथेतील साजनसिंग आदी व्यक्तिरेखांचा परदेशी वावर असल्याचे दिसून येते. 'इंडियन समर' मधील रवी उद्‌गारतो 'आणि बॉब मिचम आणि बर्ट लॅंकेस्टर नॉट टू फरगेट कर्क डग्लस पण तुमचा मार्लन ब्रॅंडो मात्र मलाही आवडतो हं....'26 त्याचबरोबर देणं या कथेतील 'अमेरिकन बायको अमेरिकन नोकरी, अमेरिकन पैसा आणि अमेरिकन जीवन यांच्याशी मुकाबला करता करता कितीदा कर्तव्यबुद्धीचा जय होत असेल...'27

सानिया यांच्या 'ओमियागे' या कथासंग्रहातून देखील 'ओमियागे–3' या कथेतून जेसनसारखी व्यक्तिरेखा येताना दिसते. 'ओमियागे–1' या कथेतून, 'क्योतोला मी आले तो ऑक्टोबरचा महिना होता. शरदऋतू सुरू झाल्याने थंडीची चाहूल लागलेली. सगळीकडच्या झाडांचे रंग पालटू लागल्याच्या खुणा. जेसनचं घर लहानसं. तिथल्या निरूंद रस्त्यावर दाटीवाटीनं चिकटून असलेल्या घरांपैकी एकाचा वरचा मजला. बाहेरची बैठक....'28

'ओमियागे–2' या कथेतील हा संदर्भही विदेशी वातावरणाचा प्रत्यय येताना दिसतो, 'क्योतो इंटरनॅशनल हाऊसमध्ये मला जुन्को भेटली. आठवड्यातून दोनदा जपानी शिकवण्याचं काम ती स्वयंसेवक म्हणून करत होती. पहिल्याच दिवशी क्लास आटोपल्यावर आम्ही दोघी कॉफी प्यायला गेलो. एका कपावर आम्ही आपापली पुष्कळच माहिती एकमेकांना दिली. तिची मोठी मुलगी युनिव्हर्सिटीत शिकत होती. धाकटा मुलगा हायस्कुलला होता. नवरा सगळ्या इतर जपानी नवऱ्यांसारखा त्याच्या कामात बुडालेला. जुन्कोनं आपले आयुष्य आता मनासारखं काय काय करण्यात, शिकण्यात, लोकांना भेटण्यात घालवायचं ठरवलं आहे, म्हणाली....'29

त्याचबरोबर प्रिया तेंडुलकर यांच्या ठकूबाई जळगांववाले यासारख्या कथेमधून जळगांवात जन्मून डॉक्टर झालेली आणि पुढे अमेरिकेला पोचून करियर, हॉस्पिटल आणि प्रॅक्टिससाठी पंजाबी डॉक्टरशी लग्न करून पुरेपूर पस्तावलेली ही ठकूबाई मूल होण्याच्या इच्छेने भारतात येताना दिसते. जुन्या मित्राला भेटून दुकटी होण्याची खात्री उरापोटात बाळगीत स्वतंत्रपणे राहायला पुन्हा अमेरिकेला परतताना दिसून येते.

गौरी देशपांडे यांच्या पाऊस आला मोठा या कथेत दोन मृत्यूंची नकळत तुलना केलेली दिसून येते. या कथेतील नायिकेचा सख्खा बाप मेला तेव्हा आजची डिनर डेट रद्द 'इतकीच थंड प्रतिक्रिया तिच्या मनात निर्माण झाली होती. परंतु सावत्र आईच्या मृत्यूने मात्र रडण्याचा आकांत ओसरता ओसरत नसल्याचे दिसते. हाच अनुभव सानियांच्या खिडक्या कथासंग्रहातील प्रारंभी खेळाच्या या कथेतून स्वतःचा नवरा स्वतःच निवडणाऱ्या नंदिताच्या नवऱ्याचे अपघाती निधन होते. नायिका किरणला सांगते, 'अडीच तीन वर्ष झाली आता त्याला. विषय निघाला की रडू येण्याइतकी मी लवचिक नाही. उलट सगळं दूर दुसरीकडे घडलं आहे असं सांगता येतं मला. म्हणजे खरोखर तसं वाटतं. त्रास काय होणार त्यातून ते आठवताना? मी तुला सांगते किरण तो प्रसंग दिवस आणि त्या भावना या लागोपाठ इतक्या वेळा आठवून आठवून जगल्या गेल्या की आता तितकंसं काही दुःख होत नाही....'30 अशी नायकाच्या मृत्यूच्या वेळी ती पार हादरून गेली होती. ती कोसळली, रडली आणि शेवटी सावरतानाही दिसून येते.

आशा बगे यांच्या 'नातं' या कथेतही दर्शनच्या बायकोचा जळून मृत्यू एवढीच काय ती घटना घडताना दिसते. 'नातं' या कथेत आशा बगे लिहितात, 'कालपरवापर्यंत असलेली दर्शनची बायको आज नाही. भास्कर म्हणतो तसं तिचं सारं उरकलं असेल. तिच्या पदरात प्रथम पेट घेतला तेव्हाच हे संपूर्ण सुरू झाले असेल. मग हॉस्पिटलची चक्कर, सलाइन, औषधपाणी, नंतरची धुगधुगी आणि शेवटी ते मरणसुद्धा उगाचच आपलं उपचार म्हणून असेल. माणूस काल असतो. आज नसतो....31 त्याचबरोबर प्रिया तेंडुलकर यांच्या बॅनर्जी मेला या कथेत स्त्रियांच्या मनातील मृत्यूच्या भीतीचे आज सकाळी फोन आला. शरद बॅनर्जी गेला. गेला म्हणजे मेला. या जगातलं त्याचं अस्तित्व संपलं. इथून पुढे तो दिसणार नाही कुणालाच. त्याच्या बायकोला नाही. मुलांना नाही. कचेरीतल्या लोकांना नाही. त्याच्या क्लायंटस्ना नाही....32 असे वर्णन येते. या कथेतील नायिकेला आपला बॉस मेल्याची वार्ता ऐकून तिला मृत्यूबद्दल वाटणाऱ्या मानसिक भीतीचे वर्णन केलेले दिसते. उपरोक्त चारही लेखिकांच्या कथात एकच विषय आलेला आहे. गौरी देशपांडे यांच्या 'पाऊस आला मोठा' मधून दोन मृत्यू येताना दिसतात. सानियांच्या कथेत आधनिक जीवनदृष्टीतून नंदिता या विधवेची कहाणी चित्रित होताना दिसून येते. आशा बगे यांच्या 'नातं' या कथेतून दर्शनच्या बायकोचा जळून मृत्यू ही घटना घडताना दिसते. त्याचबरोबर प्रिया तेंडुलकरांच्या 'बॅनर्जी मेला' यासारख्या कथेतूनही स्त्रीच्या मनातील

मृत्युची भिती चित्रित होताना दिसते. आशयाच्या दृष्टीने हे या लेखिकांच्या लेखनातील साम्य आहे असे दिसून येते.

या लेखिकांनी आपल्या कथातून प्रयोगशील रचनाबंध वापरलेले आहेत. आशा बगे यांच्या कथातून कीर्तन, आख्यान या रचनातंत्राचा अवलंब केलेला आढळतो. आशा बगे यांच्या 'रूक्मिणी' या कथेत कीर्तनातल्या पदांशी कथानायिकेच्या आंतरमनातील स्वगतांशी अनुबंध जोडण्याचे तंत्र हे देखील एक रचनातंत्रच आहे. रूक्मिणीसारख्या कथेमधील रेणू म्हणते, 'तुझा हा कृष्ण मोठा होणार कधी आजी?हे पाळण्यातलं झोपणं सुटायला हवं आता....! तो मोठा झालाच आहे. ही रूपं. तो आपली माझ्याकरता घेतो....'33 आजीचे हे उत्तर रेणूच्या मनात सासरी आल्यावरही रेंगाळत राहते. जेव्हा ती आजीचा निरोप घेते. तेव्हा एकांतात गोपाळकृष्णाच्या सूत्रातच ती असा विचार करू लागल्याचे दिसते... 'वाटलं, माणसाचं या कृष्णाशी असलेले अनेकरंगी, अनेकपदरी नातं – त्याचे विभ्रम किती वेगवेगळे! हा कृष्ण कधी तान्हा होतो. कधी आजीसारखाही. कधी नुसता दुरून खुणावतो. कधी खूप अनोळखी. परका होऊन बसतो. कधी प्रियकर बाळपणचा सखा सवंगडीही....'33

सानियांच्या कथेतून 'डायरी, पत्रे अशी निवेदनतंत्रे उपयोगात आणली आहेत. उदाहरणार्थ 'रिच्युअल ही कथा. प्रिय, तू इतकी हवी आहेस आणि तितकीच नकोशी आहेस. तुला उपसून काढून मला जाळून टाकावंसं वाटतं. पण तू तशी कायमची मरणार नाहीस. तुला नष्टच करायचं तर तू हळूहळू मिटून जायला हवीस. मी केवढ्याा दुष्टपणानं हे सांगते आहे. माझाच तिरस्कार मी यापूर्वी कधी करायची वेळच आली नव्हती. तुला मी चुकीचंदेखील ओळखत असेन. कित्येक निर्णय मागाहून फसतात. आणि कशाचा कशाशी संबंध उरत नाही. पण उपेक्षा किती किती करायच्या.... सुमित्रा....'34

गौरी देशपांडे यांनीही 'कुणास ठाऊक' या कथेतून पत्र हाच कथानुभव केला आहे. पत्रवाचन हाच कथानुभव झालेला दिसतो. तो असा, 'बरेच दिवसात पत्र नाही म्हणून हे फारसे लिहिण्यासारखे काही नाही. 'मग कशाला लिहिलेस?' तरी पण बरे आहे ना म्हणून विचारायला लिहितेय. आम्ही सर्व ठीक. इकडे आता उकडू लागले आहे. सुभाषचा पाय मुरगाळला होता. तो आत बरा आहे. चि. मंजू दहावी फर्स्ट क्लासमध्ये पास झाली. चि. कुमार सहावी पास झाला इ. इ....'35

उपरोक्त सर्व लेखिकांच्या विचारविश्वात खूप साम्य आहे. काहीतरी शोधण्याच्या प्रयत्नात त्या आहेत. एका अर्थाने एका वाटेवरच्या सहप्रवासिनी आहेत. ही जाणीव गौरी देशपांडे यांच्या लिखाणातूनही येताना दिसते.

या समकालीन लेखिकांच्या संदर्भात जेव्हा आपण गौरी देशपांडे यांच्या कथांचा विचार करतो तेव्हा काही साम्ये तर काही भेद स्पष्टपणे दिसतात.

आधुनिक स्त्रीचे दुःख मांडणारी प्रिया तेंडुलकर यांची कथा गौरी देशपांडे आणि सानिया यांच्या परंपरेतील असल्याचे दिसून येते, आशा बगे यांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण आधुनिक आहे. परंतु परंपरेशी असलेले नाते त्यांनी तोडलेले नाही असे दिसते. त्यामुळे त्यांच्या कथांमधून परंपरा आणि नवता यांच्यातील ताण सूक्ष्मतेने जाणवत राहतो.

त्याचबरोबर समकालीनांशी काही बाबतीत नाते सांगणारी परंतु आपली वाटचाल स्वतंत्रपणे करणारी गौरी देशपांडे यांची कथा आहे असे दिसून येते....

***संदर्भ***


- मंगला आठलेकर, तिची कथा, राजहंस, पुणे, 1997, पृ. 10.
- छाया पोवार, मराठीची नागरकथा, स्नेहवर्धन, 2003, पृ. 149.
- अजिता काळे, ललित, जुलै 1988, पृ. 45.
- शुभदा पटवर्धन, चतुरा पुरवणी, लोकसत्ता, डिसेंबर 2004, पृ. 11.
- मंगला आठलेकर, तिची कथा, राजहंस, 1997, पृ. 4.
- आशा बगे, कथाविशेषांक, ललित, जुलै 1988, पृ. 35.
- लता मोहरीर, वेध साहित्यकृतीचा, कीर्ती, औरंगाबाद, 1997, पृ. 18.
- भालचंद्र फडके, मराठी लेखिका चिंता आणि चिंतन, श्रीविद्या, 1980, पृ. 18.
- गौरी देशपांडे, आहे हे असं आहे, इंडियन समर, मौज, 2004, पृ. 129.
- प्रिया तेंडुलकर, ज्याचा त्याचा प्रश्न, राजहंस, 2001, पृ. 141.
- सानिया, शोध, मौज, मुंबई, 1980, पृ. 49.